K. C. E. Society's
Moolji Jaitha College
An 'Autonomous College' Affiliated to
K.B.C. North Maharashtra University, Jalgaon.
NAAC Reaccredited Grade - A (CGPA : 3.15 - 3rd Cycle)
UGC honoured "College of Excellence" (2014-2019)
DST(FIST) Assisted College

KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945

के. सी. ई. सोसायटीचे
मूळजी जेठा महाविद्यालय
क.व.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित
'स्वायत्त महाविद्यालय'
नॅकद्वारा पुनर्मानांकित श्रेणी –'ए' (सी.जी.पी.ए. : ३.१५ – तिसरी फेरी)
विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा घोषित 'कॉलेज ऑफ एक्सलन्स' (२०१४–२०१९)
डी.एस.टी. (फीस्ट) अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त

महत्त्वाची सूचना

शिष्यवृत्ती अर्ज २०२६-२७

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष **२०२६-२७ करिता शिष्यवृत्तीचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ पासून महाविद्यालयात सुरू होणार आहे.**

तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी व अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर विहित मुदतीत आपले अर्ज ऑनलाइन भरून घ्यावेत.

आवश्यक सूचना :

1. विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड व आधार संलग्न मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवावा.
2. बँक खाते आधारशी संलग्न (DBT Enabled) असल्याची खात्री करावी.
3. मागील वर्षाची गुणपत्रिका व चालू शैक्षणिक वर्षाचे प्रवेशपत्र तयार ठेवावे.
4. उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) व इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत.
5. MahaDBT पोर्टलवरील आपली माहिती अचूक भरावी.
6. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयात जमा करावीत.

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या सूचनेची गांभीर्याने नोंद घ्यावी व शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करावी.

शिष्यवृत्ती अर्ज भरण्याची वेळ : सकाळी ११ ते ५

ठिकाण : सायन्स बिल्डींग , कॉम्पुटर लॅब, मू. जे. महाविद्यालय, जळगाव

मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (सी.जी.पी.ए.-३.१५-तिसरी फेरी) स्वायत्त

आदेशावरून
प्राचार्य
मू. जे. महाविद्यालय, जळगाव

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शिष्यवृत्तीचा ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी खालील प्रक्रिया पूर्ण करावी.

• शिष्यवृत्तीसाठी कोणत्या पोर्टलवर नोंदणी करावी..?

- **SC, ST, EWS व OPEN** या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी MahaDBT 2.0 Portal या संकेतस्थळावर आपले शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.
  तसेच **OBC, SBC, VJNT** या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या **पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखपेक्षा जास्त** असेल अशाच विद्यार्थ्यांनी MahaDBT 2.0 Portal या संकेत स्थळावर शिष्यवृत्ती अर्ज भरावे.
- **तसेच OBC, SBC, VJNT** या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या **पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी** असेल अशा विद्यार्थ्यांनी https://scholarships.gov.in/ पोर्टल या संकेत स्थळावर शिष्यवृत्ती अर्ज भरावे.

MahaDBT 2.0 Portal ऑनलाइन अर्जासाठी अधिकृत पोर्टल

१. MahaDBT 2.0 संकेतस्थळ उघडा.

1. नवीन विद्यार्थी असल्यास New Applicant Registration वर क्लिक करा.
2. आधार क्रमांक व आवश्यक माहिती भरा.
3. मोबाईलवर प्राप्त झालेला OTP टाकून पडताळणी करा.
4. लॉगिनसाठी MahaID तयार करा.
5. MahaDBT 1.0 Portal वर शैक्षणीक वर्ष २०२५-२६ मध्ये शिष्यवृत्ती अर्ज भरलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी MahaDBT 2.0 Portal वर नवीन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही . फक्त आपले लॉगिन करून आपला मागील वर्षाचा अर्जाचा तपशील तपास व त्या ठिकाणी नवीन वर्ष अर्ज भरणे पर्याय आलेला असल्यास त्यास क्लिक करून चालू वर्षाचा अर्ज भरावयाचा आहे.
6. पुढील प्रक्रिया खली दिलेल्या सुचनानुसार करावी.

२. लॉगिन करून प्रोफाइल पूर्ण करा

1. Applicant Login वर क्लिक करा.
2. MahaID टाकून लॉगिन करा.
3. वैयक्तिक माहिती भरा.
4. पत्ता व संपर्क माहिती भरा.
5. शैक्षणिक माहिती भरा.
6. उत्पन्न व जातविषयक माहिती भरा.
7. आवश्यक कागदपत्रे अपलोड करा.
8. प्रोफाइल १००% पूर्ण असल्याची खात्री करा.

३. शिष्यवृत्ती योजनेची निवड

1. All Schemes या पर्यायावर क्लिक करा.
2. आपल्या प्रवर्गानुसार योजना निवडा.

3. पात्रतेच्या अटी वाचून घ्या.
4. योग्य शिष्यवृत्ती योजनेची निवड करा.
5. Apply या पर्यायावर क्लिक करा.

४. अर्ज भरणे व अंतिम सबमिशन

1. अर्जातील सर्व माहिती काळजीपूर्वक भरा.
2. आवश्यक कागदपत्रे अपलोड करा.
3. अर्जाची माहिती पुन्हा तपासा.
4. Final Submit करा.
5. अर्जाची पोचपावती (Acknowledgement) डाउनलोड करा.
6. अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयात जमा करा.

५ . अर्जाची स्थिती कशी तपासावी?

- MahaDBT पोर्टलवर लॉगिन करा.
- My Applications या पर्यायावर क्लिक करा.
- अर्जाची सद्यस्थिती तपासा.
- अर्ज Sent Back असल्यास त्रुटी दुरुस्त करून पुन्हा Submit करा.
- Approved झाल्यानंतर पुढील DBT प्रक्रियेची स्थिती तपासा.

विद्यार्थ्यांसाठी विशेष सूचना

- अर्ज भरताना स्वतःची माहिती अचूक द्यावी.
- बँक खाते आधारशी लिंक असून NPCI Mapping सक्रिय असल्याची खात्री करावी.
- एकाच योजनेसाठी दुबार अर्ज करू नये.
- अर्ज फक्त Save Draft करून थांबू नये; अंतिम Submit करणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागाकडून अर्जाची पडताळणी करून घ्यावी.

• NSP पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन (२०२६–२७)

National Scholarship Portal (NSP) वर केंद्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी खालील प्रक्रिया पूर्ण करावी.

- NSP पोर्टलवर शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी शिष्यवृत्ती अर्ज करण्यासाठी OTR क्रमांक अनिवार्य आहे.

१. अर्ज भरण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे :

1. आधार कार्ड.
2. NSP OTR क्रमांक.
3. विद्यार्थ्याचा चालू मोबाईल क्रमांक व ई-मेल.
4. मागील वर्षाची गुणपत्रिका.
5. चालू वर्षाची प्रवेश पावती.
6. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
7. उत्पन्न प्रमाणपत्र.

8. जात प्रमाणपत्र (लागू असल्यास).
9. जात वैधता प्रमाणपत्र / नॉन-क्रीमी लेयर (योजनेनुसार).
10. बँक पासबुक.
11. रहिवासी प्रमाणपत्र (योजनेनुसार).
12. दिव्यांग प्रमाणपत्र / UDID (लागू असल्यास).

२. OTR नोंदणी (One Time Registration)

ही अनिवार्य प्रक्रिया आहे. OTR हा विद्यार्थ्याला दिला जाणारा १४ अंकी अद्वितीय क्रमांक आहे. तो संपूर्ण शैक्षणिक कारकिर्दीसाठी वापरला जातो.

OTR तयार करण्याची पद्धत:

1. NSP पोर्टल उघडा.
2. OTR Registration या पर्यायावर क्लिक करा.
3. आधार क्रमांक किंवा Aadhaar Enrolment ID (EID) निवडा.
4. आवश्यक माहिती भरून OTP पडताळणी करा.
5. मोबाईलवर आलेला Reference Number जतन करा.
6. NSP OTR App आणि Aadhaar Face RD App इन्स्टॉल करा.
7. Reference Number वापरून Face Authentication पूर्ण करा.
8. यशस्वी पडताळणीनंतर १४ अंकी OTR क्रमांक मिळेल.

OTR नोंदणी विनामूल्य आहे. एकाच विद्यार्थ्याने एकच OTR तयार करावा.

विशेष सूचना: Face Authentication करताना आधारचे Biometric Lock बंद (Unlocked) असणे आवश्यक आहे.

३. NSP पोर्टलवर लॉगिन कसे करावे ?

1. https://scholarships.gov.in/ या संकेतस्थळावर जा.
2. **Students** पर्याय निवडा.
3. Apply for Scholarship अंतर्गत Login वर क्लिक करा.
4. OTR ID आणि Password वापरून लॉगिन करा. उपलब्धतेनुसार Aadhaar किंवा APAAR Login पर्यायही वापरता येतो.
5. आवश्यक OTP / Captcha पडताळणी पूर्ण करा.

४. Basic Information भरण्याची पद्धत

लॉगिन झाल्यानंतर Basic Information विभागात खालील माहिती भरा.

- General Information – नाव, जन्मतारीख, लिंग, पत्ता.
- Academic Details – मागील परीक्षा, गुण, चालू अभ्यासक्रम.
- Application Specific Details – प्रवर्ग, उत्पन्न, योजनेशी संबंधित माहिती.
- Institute Details – महाविद्यालयाचे नाव, AISHE Code.
- Bank Details – खाते क्रमांक, IFSC इत्यादी.

सर्व माहिती आधार व शैक्षणिक कागदपत्रांशी जुळणारी असावी.

५. Fresh Scholarship अर्ज भरण्याची प्रक्रिया

क्रमवार प्रक्रिया:

1. Dashboard मधील **Apply Fresh** पर्याय निवडा.
2. दिलेल्या Guidelines काळजीपूर्वक वाचा.
3. आवश्यक Declaration स्वीकारा.
4. Application Type मध्ये Scholarship निवडा.

5. Apply वर क्लिक करून Application ID तयार करा.
6. My Applications विभागात जा.
7. संबंधित Application ID समोरील Proceed वर क्लिक करा.
8. Fill/Edit Application Form निवडा.
9. पात्रतेनुसार उपलब्ध योजनांची यादी दिसेल.
10. योग्य शिष्यवृत्ती योजना निवडा. (**PM YASASVI POST MATRIC SCHOLARSHIP SCHEME FOR OBC EBC AND DNT – MAHARASHTRA**)
11. मागितलेली माहिती भरा व आवश्यक कागदपत्रे अपलोड करा.
12. Preview करून सर्व माहिती तपासा.
13. **Final Submit** करा.
14. Application ID आणि अर्जाची प्रत डाउनलोड करा.

८. शिष्यवृत्ती अर्जाचे नियम व अटी

1. विद्यार्थ्याने स्वतःच्या नावाने अर्ज करावा.
2. OTR क्रमांक एकाच विद्यार्थ्यासाठी एकच असावा.
3. चुकीची माहिती किंवा बनावट कागदपत्रे देऊ नयेत.
4. उत्पन्न प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे वैध असावीत.
5. महाविद्यालय व अभ्यासक्रमाची माहिती योग्य असावी.
6. मागील वर्षाची शैक्षणिक प्रगती योजनेच्या नियमानुसार असावी.
7. एकाच शैक्षणिक वर्षात दोन योजनांसाठी अर्ज करता येत नाही.
8. अर्जाची अंतिम तारीख संपण्यापूर्वी Final Submit करणे आवश्यक आहे.

९. अर्जाची स्थिती कशी तपासावी?

Student Login करून My Applications विभागात अर्जाची स्थिती तपासा.

स्थिती	**अर्थ**
Submitted	अर्ज सादर झाला
Pending at Institute	संस्थेकडे पडताळणी प्रलंबित
Verified	पडताळणी पूर्ण
Defective	अर्जात त्रुटी आहे
Rejected	अर्ज नाकारला
Approved	अर्ज मंजूर

Defective असल्यास त्रुटी दुरुस्त करून अर्ज पुन्हा सादर करा. त्यासाठी My Applications ⟶ Proceed ⟶ Fill/Edit Application Form वापरा.